फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

## (स्थापना : २६ जानेवारी १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)

# वार्षिक अहवाल

## (१ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४)

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी : २४२२ ३५ ८९ / २४२१ ९० ११



मंडळाच्या ५६ व्या वसंतव्याख्यानमालेचे उद्घाटन करताना लोकसभा अध्यक्ष
मा. श्री. मनोहर जोशी यांच्या सत्कार प्रसंगी.



बालनाट्य प्रशिक्षण शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुण्या
अभिनेत्री सुचित्रा बांदेकर मुलांना पारितोषिके देताना

# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई – ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१८/७/२००४ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेच्या उपाध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :–

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. वार्षिक अहवाल (सन २००३ व २००४ सालचे) मंजूर करणे.
३. हिशेब व ताळेबंद (सन २००३ व २००४ सालचे) मंजूर करणे.
४. हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन २००४–२००५ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६. इमारत निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

दि. ३०/६/२००४

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
उमेश व्यं. शेणॉय
कार्यवाह

सूचना :

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना–नियमानुसार ही सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल.
२. सभासदांना हिशेबासंबंधी माहिती हवी असल्यास ती कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६ ते ८ पर्यंत) दिनांक १०/७/२००४ पर्यंत मिळेल.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरूपात शनिवार दिनांक १०/७/२००४ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान (रविवार सोडून) आणून द्यावेत.
४. ज्या सभासदांचे पत्ते बदललेले असतील त्यांनी त्यांचे बदललेले पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी/संबंधितांनी मंडळास तद्संबधीची माहिती त्वरित कळवावी.

# वार्षिक अहवाल

## (दिनांक १ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर वन्दे

मंडळाचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत मंडळाची आर्थिक बाजू मजबूत असून क्रीडा, कला, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यात मंडळ सतत अग्रेसर राहून कार्य करीत आहे हे सर्वश्रुत आहेच. या सर्व कार्यात आपला पाठींबा व प्रोत्साहन सतत आमच्या सोबत आहे. म्हणूनच हे सर्व करणे आम्हास शक्य होत आहे याची नोंद कृतज्ञतापूर्वक आम्ही घेतलेली आहे.

मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**सभा :** वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या ९ सभा झाल्या. कार्यकारी समिती व विश्वस्त यांच्या २ संयुक्त सभा झाल्या. (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट १ पाहा).

**विभागवारी निधी :** अहवाल काळांत इमारत निधी, वसंत व्याख्यानमाला निधी, कलाविभाग निधी व क्रीडा विभाग निधी यात अनुक्रमे रू. ९,००,००० /- (रूपये नऊ लाख फक्त) रू. ३०,०००/- (रूपये तीस हजार फक्त), रू. ४०,०००/- (रूपये चाळीस हजार फक्त), रू. ४०,०००/- (रूपये चाळीस हजार फक्त) वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :** १ जुलै २००३ ते ३१ डिसेंबर २००३ या कालावधीसाठी **'विकी केटरर्स व डेकोरेटर्स'** यांना संपूर्ण केटरिंग व डेकोरेशन यासाठी मुदत वाढ देण्यात आली. तर १ जाने. २००४ ते ३१ डिसेंबर २००४ या कालावधीसाठी निविदा मागवून **'अमित केटरर्स'** यांना संपूर्ण केटरिंग व्यवस्थेसाठी मुक्रर करण्यात आले.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ५६ वी वसंत व्याख्यानमाला दिनांक २० एप्रिल ते २७ एप्रिल २००३ या दरम्यान संपन्न झाली. सन्माननीय लोकसभाध्यक्ष **मा. श्री. मनोहर जोशी**

यांच्या 'सर्वभाषिक वृत्तपत्र प्रतिनिधीच्या उपस्थितीत प्रकट मुलाखतीने' व्याख्यानमालेचे उद्‌घाटन होऊन महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व गृहराज्यमंत्री, मा. श्री. भाई वैद्य यांच्या 'इराक, अमेरिका आणि भारत' या विषयावरील चिंतनशील भाषणाने समारोप करण्यात आला. व्याख्यानमालेस श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

(अधिक माहितीसाठी परिशिष्ट क्र. २ पाहा.)

## इतर कार्यक्रम

★ २९ जुलै २००३ या कै. सुधीर फडके उर्फ 'बाबूजी' यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त मेघमल्हार निर्मित बाबुजींच्या निवडक मराठी गीतांचा कार्यक्रम – **'अशी पाखरे येती'** मंडळाच्या सभागृहात सादर करण्यात आला. या कार्यक्रमास चांगलाच प्रतिसाद लाभला.

★ मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. मधुकर जर्नादन फडके यांचे दि. ७ ऑगस्ट २००३ रोजी अकाली निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दि. २१ ऑगस्ट २००३ रोजी शोकसभा ज्येष्ठ समाजसेवक व मंडळाचे संस्थापक श्री. प्रकाशभाई मोहाडीकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यांत मंडळासोबत अनेक संस्था सहभागी झाल्या होत्या.

★ भारतीय स्वातंत्र्याच्या ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त १५ ऑगस्ट २००३ रोजी शिक्षण क्षेत्रातील एक मान्यवर व स्वातंत्र्य सैनिक **'ॲड. नरेंद्रनाथ गोविंद पाटकर'** यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

या प्रसंगी क्रीडा क्षेत्रातील उदयाला येत असलेल्या तसेच अभ्यासांतहि नैपुण्य मिळविलेल्या **कु. अस्मिता मिलिंद चितळे** हिचा मंडळाच्या वतीने गुणगौरव करण्यात आला. तसेच अभ्यासात विशेष प्रगति करणाऱ्या मंडळाच्या खेळाडूंचाहि यथायोग्य सन्मान करण्यात आला.

★ २ ऑक्टोबर २००३ (गांधी जयंती दिनी) मंडळाच्या वतीने, मुंबईतील एकमेव महिलांचे डॉक्टर, महिलांनी फक्त महिलांसाठी चालविलेल्या **'सखी'** आरोग्य केंद्राच्या सहकार्याने महिलांमध्ये आढळणाऱ्या रोगांसंबंधी तसेच उपचारासंबंधी माहिती देणारा एक विशेष कार्यक्रम महिलासाठी सादर करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. अनिता बापट – पटेल व डॉ. मंदाकिनी परिहार यांनी संपूर्ण मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांस बहुसंख्य महिला उपस्थित

होत्या. चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक माहिलांनी असा कार्यक्रम परत करावा अशी विनंती केली.

★ मंडळाचे संस्थापक व प्रख्यात समाजसेवक 'मा. श्री. प्रकाशभाई मोहाडीकर' यांचा त्यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त **'प्रकाशभाई मोहाडीकर गौरव समिती'** यांच्या वतीने हृदय सत्कार समारंभ तसेच त्यांना **'दादर भूषण पुरस्कार'** देण्याचा कार्यक्रम मंडळाच्या प्रांगणांत दि. ११ जानेवारी २००४ रोजी पार पाडण्यात आला. मंडळाने या कार्यक्रमासाठी आपली जागा विनामूल्य दिली तसेच कार्यक्रमासाठी रू. ५०००/- गौरव समितीकडे देणगी स्वरूपात जमा केले. गौरव समितीचे तात्पुरत्या स्वरूपांत ऑफिस करण्यासाठीही त्यांना जागा विनामूल्य देण्यात आली.

★ दिनांक २६ जानेवारी २००४ या दिवशी भारतीय प्रजासत्ताक दिनी अंधाच्या क्रीडा जगतात आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणारी अंधमहिला **श्रीमती नेहा पावसकर** यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच मंडळाच्या ५७ वा वर्धापनदिनाचे निमित्त साधून 'मेघ मल्हार' निर्मित 'भाव-बंध' हा मराठी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

★ भारतीय नववर्ष स्वागत समिती, दादर, मुंबई यांच्या वतीने दि. २१ मार्च २००४ रोजी गुढीपाडव्यानिमित्त आयोजित भव्य 'नववर्ष स्वागत' यात्रेत मंडळाने तसेच मंडळाचे कार्यध्यक्ष श्री. चिंतामणी नागले यांनी सक्रीय सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी मंडळाने रू. १०००/ देणगी स्वरूपात समितीकडे सुपुर्द केली.

## विशेष उल्लेखनीय

मराठी वृत्तपत्र लेखक संघातर्फे समाज प्रबोधन क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्थेला प्रतिवर्षी देण्यात येणारा कै. दादाजी वैशंपायन पुरस्कार यंदा मंडळाला प्राप्त झाला.

★ **संकीर्ण :**

१) 'श्री भागोजी खेरटकर' (चौकीदार) यांच्याजागी दि. २७/६/२००३ पासून श्री. संदीप द. चांदे व सचिन गो. शिंदे यांची (चौकीदार) म्हणून नेमणूक करण्यात आली.

२) जिल्हा तसेच राज्यस्तरावर निवडून जाणाऱ्या मंडळाच्या खेळाडूंना हातखर्चासाठी देण्यात येणारी रक्कम वाढवून प्रत्येकी रू. २००/– (जिल्हा स्तरासाठी) व रू. ५००/– (राज्यस्तरासाठी) याप्रमाणे दि. १ जाने. २००४ पासून वाढवून देण्यात आली. त्याचप्रमाणे तसेच अंतिम विजयी संघाला पारितोषिकापोटी मिळणारी रोख रक्कम संपूर्णपणे खेळाडूंना वरील तारखेपासून देण्यास सुरूवात झाली.

३) कबड्डी (मुली) व खो खो (मुले/मुली) या संघाना त्यांच्या मोसमांतील सर्वोत्कृष्ट कामगिरी बद्दल मंडळाच्या वतीने **'ट्रॅकसूट'** देण्यात आले.

क्रीडा व कला विभागाबद्दलची माहिती सोबत जोडलेली आहे.

---



## श्रद्धांजली

*मंडळाचे अध्यक्ष श्री. मधुकर फडके, विश्वस्त एकनाथ सावंत तसेच मंडळाचे तहह्यात सभासद सर्वश्री संभाजी बिर्जे, चंद्रकांत देसाई, पुरूषोत्तम वेदपाठक, यशवंत कामत व रमाकांत टाकळे यांचे अहवाल काळांत निधन झाले या सर्वांना तसेच अज्ञात तहह्यात सभासदांना मंडळाच्यावतीने*

*भावपूर्ण श्रद्धांजली.*

उमेश व्यं. शेणॉय

कार्यवाह

(कार्यकारी समितीसाठी)

# क्रीडा विभाग

## (वार्षिक अहवाल १ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४)

### खो खो

अ) युवक क्रीडा मंडळ, परळ (एप्रिल २००३), मुंबई खो खो संघटना जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा (ऑक्टोबर २००३) आणि मुंबई शारीरीक शिक्षण मंडळ (जानेवारी २००४) या तीन संस्थांच्या ज्युनियर गट (१८ वर्षे वयोगट) खो खो स्पर्धतील मुले व मुली अशी दोन्ही अजिंक्यपदे निर्विवादपणे पटकावून अमर हिंद मंडळाने या गटातील आपले वर्चस्व सिद्ध केले. एकाच आर्थिक वर्षातील असा तिसऱ्यांदा दुहेरी पराक्रम हे मंडळाच्या क्रीडा इतिहासातील सुवर्ण पान आहे.

ब) ओम् समर्थ भारत व्यायाम मंदिर (माहीम) यांनी संयोजित केलेल्या ज्युनियर गट खो खो स्पर्धेत मंडळाच्या कुमार खेळाडूंनी ''मुंबई ज्युनियर क्रमांक एक'' हे वैशिष्ट्य कायम राखले तर मंडळाच्या ज्युनियर मुलींचा हा आनंद थोडक्यात हुकला.

क) मंडळाच्या महिला संघाने मुंबई शहर जिल्हा अजिंक्यपद खो खो स्पर्धेत उप-विजयी पद संपादन केले.

ड) प्रतिनिधिक संघात निवड :

१) **प्रसाद कांबळी :** मुंबई व महाराष्ट्राच्या ज्युनियर संघात निवड; राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व मिळविणारा अमर हिंद मंडळाच्या पुरूष विभागातील हा पहिला खेळाडू आहे.

२) **प्रीती धुरी :** मुंबई व महाराष्ट्राच्या महिला संघात निवड.

३) **सपना कर्पे :** मुंबई महिला संघात निवड.

४) रोहन चव्हाण, निकेश धुरी, योगेश सोनावणे, गीतांजली तुळसणकर, विशाखा गव्हाणे, शुभदा धुरी, व रीचा फर्नांडीस या सर्वांची मुंबई ज्युनियर संघात निवड झाली. (शुभदा व रीचा वैद्यकीय कारणास्तव राज्य स्पर्धेत सहभागी होऊ शकल्या नाहीत).

५) अमेश गोडकर : मुंबई सब-ज्युनियर संघात निवड (१४ वर्षे वयोगट)

६) राज्य शालेय खो खो स्पर्धेसाठी (१९ वर्षे वयोगट) आपापल्या कॉलेजामार्फत मुंबई शालेय संघाचे प्रतिनिधित्व केलेले मंडळाचे खेळाडू :-

निलेश सावंत, प्रसाद कांबळी, रोहन चव्हाण, गणेश बोरकर, शुभदा धुरी, गीतांजली तुळसणकर, विशाखा गव्हाणे, शुभदा कदम, रीचा फर्नांडीस, सोनाली घाणेकर, व शिल्पा खोपडे.

इ) वैयक्तिक पारितोषिके :

प्रसाद कांबळी, शुभदा धुरी (प्रत्येकी दोन वेळा) व निकेश धुरी (एक वेळा) यांनी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा बहुमान संपादन केला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमकाचा बहुमान विशाखा गव्हाणेने दोन वेळा, तर सपना कर्पे, रोहन चव्हाण, रश्मी वारीसे यांनी एकेकदा मिळविला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट सरंक्षणाचा बहुमान रीचा फर्नांडीसने दोन वेळा तर निलेश सावंत व अनिरुद्ध रेडेकर यांनी एकेकदा पटकावला.

## कबड्डी

महिला :

अ) अजिंक्यपदे : बाल विकास मंडळ (काळाचौकी), विशाल जुन्नर/इलेव्हन फायटर (घोडपदेव), ओम् ज्ञानदीप मंडळ (वरळी), मुंबई शहर ज्युनियर गट.

ब) उप-विजयी पदे : स्वामी समर्थ क्रीडा मंडळ ( प्रभादेवी ), अमर क्रीडा मंडळ (वरळी), साई प्रसाद उत्सव मंडळ (वरळी), एकता संघ (लोअर परळ), मावळी मंडळ (ठाणे), राज्यस्तरीय स्पर्धा उर्वरीत सर्व स्पर्धा जिल्हास्तरीय.

क) टागोर नगर मित्र मंडळ (विक्रोळी) व सुर्योदय क्रीडा मंडळ (प्रभादेवी) या दोन्ही राज्यस्तरीय स्पर्धेत अनुक्रमे ३ रा व ४ था क्रमांक मिळाला.

ड) वैयक्तिक : **अलका पारकर व तृप्ती भाटकर या आपल्या अष्टपैलू खेळाडूंनी विविध स्पर्धांतून अनुक्रमे ६ व ५ पारितोषिके निर्विवादपणे पटकावली.**

कार्तीकी शिंगटे व मिनाक्षी गोठप यांचाही एकेका स्पर्धेत वैयक्तिक गुणगौरव झाला.

**इ) प्रतिनिधिक संघात निवड :**

१) अलका पारकर व शारदा भोगले यांची महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद (महिला गट) स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात निवड. याच दोघींनी रत्नागिरी येथे झालेल्या अश्विनीकुमार गावंड सुवर्ण चषक अखिल भारतीय स्पर्धेसाठी सहभागी झालेल्या मुंबई शहर संघाचेही प्रतिनिधित्व केले.

२) मधुरा मोरे व माधुरी पावसकर यांची महाराष्ट्र शालेय संघात (१७ वर्षे वयोगट) निवड.

३) तृप्ती भाटकर व शितल आंब्रे यांची मुंबई शहर ज्युनियर संघात निवड.

४) विद्यापीठ संघात निवड :

अलका पारकर, संध्या तोडणकर, शारदा भोगले यांची एस्. एन्. डी. टी. विद्यापीठ संघात निवड.

पुरूष कबड्डी संघाची बांधणी नव्याने चालू आहे. दैनंदिन प्रशिक्षणातून तयार होत असलेल्या नवोदित खेळाडूंचे संच जिल्हास्तरीय स्पर्धातून भाग घेतात. त्यांची प्रगती समाधानकारक आहे.

## अभिनंदनीय :

१) निलेश सावंत (खो खो खेळाडू)

अ) महाराष्ट्र शासनाच्या १९ वर्षे वयोगट स्पर्धेतील १५०० मीटर अंतराच्या स्पर्धेत मुंबई शहरातून सुवर्ण पदक व नंतरच्या विभागीय स्पर्धेत ब्राँझ पदक संपादन केले.

ब) ज्युनियर कॉलेज स्पोर्टस् असोसिएशनच्या आंतर ज्युनियर कॉलेज स्पर्धेत ५००० मीटर अंतराच्या शर्यतीत अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदक पटकावले.

२) खो खो प्रशिक्षक जतीन टाकळे यांची मुंबई शहर सब-ज्युनियर (१४ वर्षे वयोगट) संघ निवड समितीवर नियुक्ती झाली.

३) प्रतिवर्षी २९ मे, २००३ रोजी देण्यात येणाऱ्या यू आर् एल् फाऊंडेशनच्या पुरस्काराचे यंदाचे मानकरी कार्यकारीणीचे सदस्य श्री. भास्कर केरकर (खो खो कार्यकर्ते) व आजीव सभासद श्री. वसंत भालेकर (क्रीडा पत्रकार) यांना सन्मानीत करण्यात आले.

४) महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघटनेतर्फे मंडळाचे उपाध्यक्ष व क्रीडा प्रमुख रमेश वरळीकर यांच्या लोकसत्तेतील ''बिनबुटाचा बिनबॅटीचा खो खो '' या लेखाला 'महाराष्ट्र दीप' पुरस्कार मिळाला.

५) मंडळाची खो खो खेळाडू कु. अस्मिता मुतालीक हिला विशाखापट्टण येथे झालेल्या एन्. सी. सी. च्या १२ दिवसाच्या राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरातील फायरींग प्रकारात रौप्य पदक मिळाले. या शिबिरासाठी निवडलेल्या महाराष्ट्राच्या १० मुलींमध्ये कु. अस्मिता ही एकमेव मुंबईकर होती.

## इतर :

**१) क्रीडा दिन :** हॉकीचे महान जादुगार स्वर्गीय मेजर ध्यानचंद यांचा जन्मदीन हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून प्रतिवर्षी राष्ट्रभर साजरा केला जातो. मुंबईत यंदा हा मान महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रीडा परिषद मुंबई शहर यांच्या मार्फत अमर हिंद मंडळाला मिळाला. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन शासनाच्या क्रीडा विभागाचे उप. सचिव श्री. रा. रा. धोत्रे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी शासकीय क्रीडाधिकारी श्री. एन्. यु. श्रोते आणि एन्. बी. मोटे उपस्थित होते. प्राचार्य गो. वि. पारगावकर, श्री. ॲलेक्स वास, प्रा. सौ. निता ताटके, श्री. मनोहर इंदूलकर व श्री. रमेश वरळीकर यांची विविध खेळांवर मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. श्री. वरळीकर यांनी सूत्रसंचालन केलेल्या प्रश्न-मंजूषा कार्यक्रम रंगतदार झाला. सुमारे १५० व्यक्तिंची उपस्थिती लाभलेल्या या कार्यक्रमासाठी भोजन व चहापानाची जबाबदारी मंडळाने पार पाडली. ही सेवा अमित कॅटरर्सने उत्तम तऱ्हेने सांभाळली. या क्रीडा दिनाच्या निमित्ताने मंडळाने केलेल्या चित्रफलकांचे प्रदर्शन एक छान आकर्षण ठरले. उपस्थितांनी या उपक्रमाचे मन:पूर्वक कौतुक केले.

२) **महिला दिन :** प्रतिवर्षी ८ मार्च हा दिवस महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून खेळाडूंच्या मातांसाठी ''खेळाडू व आहार'' या विषयावर आहार – तज्ञ सौ. गायत्री बर्वे यांचे व्याख्यान ८ मार्च ०४ रोजी आयोजित केले होते. सुमारे १०० व्यक्तिंची उपस्थिती असलेल्या या कार्यक्रमात सौ. बर्वे यांनी शास्त्रशुद्ध व सचित्र मार्गदर्शन करून सुयोग्य आहाराचे महत्व पटवून दिले.

उपनगरातून दूरवरून आलेल्या महिलांची उपस्थिती व जिज्ञासा लक्षणीय ठरली. श्री. परशुराम नाबर यांच्या कुंचल्यातून चितारलेले माहिती फलक खास आकर्षण ठरले. **सौ. बर्वे** यांनी सुचविलेल्या 'क्रीडापटूंचे खाद्य पदार्थांच्या कृतींचे पत्रक' या निमित्ताने मंडळाने प्रकाशित केले.

वरील दोन्ही प्रदर्शनांची संकल्पना **क्रीडा प्रमुख श्री. रमेश वरळीकर** यांची होती.

**दैनंदिन सराव :**

१) कबड्डी – मुले – मुली : श्री विजय राणे / श्री. सुनिल निंबाळकर

२) खो खो – मुली : श्री. प्रफुल्ल पाटील / श्री. संजय पेडणेकर

मुले : श्री. रमेश नाटेकर / श्री. जतीन टाकळे

क्रीडा प्रमुख श्री. रमेश वरळीकर आवश्यक तेव्हा खो खोत मार्गदर्शन करतात. संबंधित प्रशिक्षक जेव्हा अनुपस्थित असतात तेव्हा संघातील जेष्ठ खेळाडू सरावाची जबाबदारी पार पाडतात.

## : विशेष अभिनंदनीय :

खो खो क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेबद्दल महाराष्ट्र शासनाने २००२–०३ चा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देऊन सन्मानित केलेल्या अमर हिंद मंडळाचे विद्यमान कार्यवाह **श्री. उमेश शेणॉय** यांचा भव्य सत्कार लोकसभा अध्यक्ष **मा. श्री. मनोहर जोशी** यांच्या अध्यक्षतेखाली मंडळाच्या पटांगणात ९ फेब्रुवारी २००४ रोजी करण्यात आला.

आपल्या खुमासदार भाषणात श्री. मनोहर जोशी यांनी श्री. उमेश शेणॉय यांच्या अष्टपैलू कतृत्वाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

शिवछत्रपती पुरस्काराचे खेळाडू मानकरी खो खो पटू श्री. मंदार म्हात्रे व कु. दीप्ती दळवी आणि कबड्डीपटू कु. मेधा कोरगांवकर यांचाही सत्कार या प्रसंगी झाला.

नगरपाल डॉ. जगन्नाथ हेगडे, टपाल तिकिट संघटनेचे श्री. धीरूभाई मेहता न्यू. इंडिया एशोरन्सचे श्री. मोरेश्वर गर्दे, दादर भूषण श्री. प्रकाश मोहाडीकर, आमदार सौ. विशाखा राऊत, क्रीडा पत्रकार श्री. वि. वि. करमरकर, श्री. संदीप चव्हाण, मल्लखांब संघटक श्री. उदय देशपांडे, इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे श्री. अशोक प्रधान, सौ. सीमा कोल्हटकर प्रभूतिनी आटोपशीर भाषणात शेणॉय यांचा गुणगौरव केला.

---



# आदरांजली

मंडळाचे दिवंगत अध्यक्ष कै. मधुकर जनार्दन फडके यांच्या प्रथम स्मृतिदिनी शनिवार, दि. ७ ऑगस्ट २००४ रोजी आयोजित केलेल्या सभेस त्यांना आदरांजली वाहण्यासाठी आपण अगत्याने उपस्थित रहावेत ही विनंती.

★ ★ ★

# कला विभाग

## (१ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४)

### नाट्यतंत्र प्रशिक्षण शिबीर

मंडळाच्या कला विभागाने प्रथमच नाट्यतंत्र प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले. २६ जुलै ते ३ ऑगस्ट २००३ या कालावधीत घेतलेल्या या शिबीरात ३२ शिबीरार्थींनी प्रवेश नोंदविला. शिबिराला मार्गदर्शक म्हणून श्री. अशोक पाटोळे (नाट्यलेखन), श्री. विजय केंकरे (नाट्यदिग्दर्शन), श्री. कमलाकर नाडकर्णी (रंगभूमीची वाटचाल), श्री. राजन भिसे (नाट्य नेपथ्य, वेशभूषा), श्री. संजय क्षेमकल्याणी (नाट्यअभिनय), श्री. रत्नाकर पिळणकर (नाट्य पार्श्वसंगीत), श्री. प्रशांत टिपणीस (रंगभूषा) हे मान्यवर लाभले. शिबीराचा समारोप सुप्रसिद्ध अभिनेते श्री. सुहास पळशीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या समारोपावेळी शिबीरार्थींनी 'देऊळ' आणि 'बॅक' ही दोन उत्फुर्त नाट्ये सादर केली. नाट्यतंत्राशी निगडीत अनेक अंगाची माहिती तज्ञ मार्गदर्शकांद्वारे आणि अल्प प्रवेशमुल्य घेऊन उपलब्ध करून दिल्याबद्दल शिबीरार्थींनी मंडळाचे आभार मानले तर भारत पेट्रोलियमच्या शिबीरार्थींनी मंडळाला नटराजाची प्रतिमा भेट दिली.

### कै. आबा पडते राज्यस्तरीय 'प्रेक्षक न्यायाधीश' एकांकिका स्पर्धा

मंडळाचे संस्थापक सदस्य कै. आबा पडते यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा या वर्षी देखील उत्साहात पार पडली. दि. २७ व २८ सप्टें. रोजी झालेल्या प्राथमिक फेरीत सत्तावीस संस्थानी सहभाग नोंदवून आपापल्या एकांकिका सादर केल्या. अत्यंत चुरशीत सादर केलेल्या या एकांकिका मधून अंतिम फेरीसाठी सहा एकांकिकांची निवड परीक्षक श्री. संजय क्षेत्रकल्याणी आणि श्रीमती सुलभा मंत्री यांनी केली. अंतिम फेरीत अश्वमेध निर्मित – **'सत्यम् शोधम् सुंदरम्'**, इंद्रधनू निर्मित **'मान्यतेच्या झग्याखाली'**, अनायय निर्मित – **'तुझ्या आयला'**, अजात शत्रू निर्मित – **'मंथरमाया'**, ब्राह्मण सभा कला क्रीडा निर्मित – **'सौदामिनी'**, सह्याद्री कला मंच निर्मित **'निष्फळ'** या एकांकिका दि. ११ व १२ ऑक्टो. रोजी सादर करण्यात आल्या. अंतिम फेरीसाठी संस्था प्रतिनिधींनी प्रेक्षक न्यायाधीश म्हणून सर्व एकांकिका पाहिल्या परीक्षक म्हणून परीक्षण कसे करावे, प्रत्येक एकांकिकेचे वैशिष्ट्य,सादरीकरण वगैरे बाबी समजावून सांगण्यासाठी जेष्ठ पत्रकार श्री. कमलाकर नाडकर्णी तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. सर्व एकांकिकांचे सादरीकरण झाल्यावर लगेचच निवड झालेले प्रेक्षक न्यायाधीश व्यासपीठावर आले त्यांच्या सोबत समन्वयक म्हणून श्री. सुहास

कामत यांनी काम पाहिले आणि सर्वांसमक्ष चर्चेद्वारा पारितोषिकांची निवड करण्यात आली. प्रेक्षक न्यायाधीश ही संकल्पना रंगभूमीसाठी नविन असून असा अभिनव उपक्रम राबविण्याचे श्रेय अमर हिंद मंडळाला लाभले. प्रेक्षक न्यायाधीश म्हणून काम पाहणाऱ्या सर्व प्रेक्षक न्यायाधीशांनी एकांकिका नाट्य परीक्षण कसे करावे या बाबत श्री. कमलाकर नाडकर्णी यांनी अमुल्य मार्गदर्शन केल्याचे मान्य केले आणि अमर हिंद मंडळाने त्यांना प्रेक्षक न्यायाधीश म्हणून काम करण्याची संधी देऊन त्यांच्या ज्ञानात मोलाची भर घातल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती कविता लाड-मेढेकर यांचे हस्ते संपन्न झाला त्यावेळी व्यासपिठावर श्री. कमलाकर नाडकर्णी, सुहास कामत, श्री. संजय क्षेमकल्याणी, श्री. अनंत घोगळे इ. मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेचे आयोजन अमर हिंद मंडळाच्या कार्यकारी समितीच्या मार्गदर्शनाखाली कला विभाग प्रमुख श्री. दत्ता सावंत यांनी केले तर सौ. हेमा घरत, श्री. प्रवीण त्रिभूवन, श्री. योगेद्र माने, यांनी आयोजनात सहाय्य केले.

कै. आबा पडते राज्यस्तरीय प्रेक्षक न्यायाधीश एकांकिका स्पर्धा आता मुंबईतील प्रमुख एकांकिका स्पर्धा म्हणून आपले स्थान सिद्ध करु लागली आहे.

**महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा :**

कलाविभागाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत भाग घेतला. या वर्षी **श्री. दत्ता सावंत** यांनी लिहीलेले **"आभाळंच फाटलंय्"** हे नाटक सादर करण्यात आले. नाटकाचे दिग्दर्शन श्री. भरत पुरोहित यांनी केले होते भरत पुरोहित, जस्मिन शहा, कोमल म्हात्रे, अमृता नाईक, जितेंद्र आगरकर, भाग्यश्री पाणे, विशाल सोनावणे, योगेंद्र माने या कलाकारांनी भूमिका केल्या. सामाजिक समस्येचं वास्तववादी प्रकटीकरण आणि कलाकारांनी साकारलेल्या योग्य भूमिका यामुळे नाटक रसिकांची दाद घेऊन गेले. भाग्यश्री पाणे या अभिनेत्रीस अभिनयाचे पारितोषिक मिळाले. या नाटकाचे वैशिष्टय म्हणजे जुलैमध्ये घेतलेल्या नाट्यतंत्र प्रशिक्षण शिबीरातील नवोदितांना अभिनय तसेच तंत्रज्ञ या क्षेत्रात संधी देण्यात आली.

**'अमर हिंद मंडळ'** कलाविभागाच्या माध्यमातून हौशी, होतकरू, तरूण कलाकार तंत्रज्ञ यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहे. तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन त्यांना उपलब्ध करून देत आहे.

# कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती
# (परिशिष्ट १)

| | २००३-२००४ |
|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | ८ |
| २) श्री. अरूण अ. देशपांडे ( कार्योपाध्यक्ष) | ८ |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ८ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (स. कार्यवाह) | ८ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | ८ |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ९ |
| ७) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | ८ |
| ८) श्री. चारूदत्त शां. थरवल (सदस्य) | ७ |
| ९) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य) | ८ |
| १०) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ९ |
| ११) डॉ. स्नेहल मा. बिर्जे (सदस्य) | ४ |
| १२) श्री. प्रफुल्ल दा. पाटील (सदस्य) | ८ |
| १३) श्री. विजय प्र. राणे (सदस्य) | ६ |
| १४) सौ. विद्या वि. अडसूळे (सदस्य) | ० |

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५८ वे)

(परिशिष्ट २)

## कार्यक्रम पत्रिका

रविवार दि. २० एप्रिल, २००३

उद्घाटक : सन्माननीय लोकसभाध्यक्ष श्री. मनोहर जोशी

विषय : 'प्रकट मुलाखत'

सोमवार दि. २१ एप्रिल २००३

वक्ते : मा. श्री. चंद्रशेखर टिळक

विषय : 'आर्थिक घोटाळे व आम्ही'

मंगळवार दि. २२ एप्रिल २००३

वक्ते : मा. श्री. राघव नरसाळे

विषय : 'जागतिकिकरण आणि मध्यम वर्गासमोरील आव्हाने'

बुधवार दि. २३ एप्रिद २००३

वक्ते : मा. डॉ. विजय जोशी

विषय : 'उद्याचा, नवा भारत'

गुरूवार दि. २४ एप्रिल २००३

वक्त्या : प्रतिभा रानडे

विषय : 'अफगाणिस्तान काल आणि आज'

शुक्रवार दि. २५ एप्रिल २००३

सहभाग :

| | |
|---|---|
| श्रावणी देवधर | चित्रपट दिग्दर्शिका |
| मेधा कुलकर्णी | आकाशवाणी |
| नीना राऊत | दूरदर्शन |
| वैजयंती कुळकर्णी - आपटे | वृत्तविषयक |
| प्रतिमा कुळकर्णी | मालिका |

विषय : 'निर्मितीचे क्षण' प्रसार माध्यमांच्या निरनिराळ्या क्षेत्रात आज आघाडीवर असलेल्या पाच महाराष्ट्रीय महिलांच्या मुलाखतीचा कार्यक्रम'.

शनिवार दि. २६ एप्रिल २००३

वक्ते : डॉ. मुरलीधर शाह

विषय : 'धर्म आणि महात्मा गांधी '

रविवार दि. २७ एप्रिल २००३

वक्ते : मा. श्री. भाई वैद्य

महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व गृहराज्यमंत्री, राष्ट्रसेवा दलाचे भूतपूर्व अध्यक्ष, संस्थापक समाजवादी जनपरिषद.

विषय : 'इराक, अमेरिका आणि भारत'



मुंबई शहर (ज्युनियर) जिल्हा खो खो स्पर्धेत अमर हिंद मंडळाचे मुलांचा विजयी संघ.



मुंबई शहर (ज्युनियर) जिल्हा खो खो स्पर्धेत अमर हिंद मंडळाच्या मुलीचा विजयी संघ.

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४


❖ विश्वस्त ❖

श्री. दिनकर शं. पाटील    श्री. मुकुंद आ. तिवरेकर

श्री. एकनाथ ना. साटम (२१ फेब्रु. २००४ पर्यंत)

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | श्री. मधुकर ज. फडके (७ ऑगस्ट २००३ पर्यंत) |
| उपाध्यक्ष | : | श्री. रमेश मा. वरळीकर |
| | | श्रीमती उषा शं. मेहता |
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी वि. नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. अरूण अ. देशपांडे |
| कार्यवाह | : | श्री. उमेश व्यं. शेणॉय |
| सह कार्यवाह | : | श्री. सतीश श. रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण शं. राणे |
| सदस्य | : | श्री. दीपक ना. पडते |
| | | श्री. भास्कर भि. केरकर |
| | | श्री. चारूदत्त शां. थरवल |
| | | श्री. दत्ता अ. सावंत |
| | | श्री. संजय वि. पेडणेकर |
| | | डॉ. स्नेहल मा. बिर्जे |
| | | श्री. प्रफुल्ल दा. पाटील (स्वीकृत) |
| | | श्री. विजय प्र. राणे (स्वीकृत) |
| | | ॲड. विद्या वि. अडसुळे (स्वीकृत) |